महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग

दूरध्वनी क्र.०२२-२२०१७१०६
Email ID :- sopr4.rdd-mh@nic.in

बांधकाम भवन, मर्झबान पथ,फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.

---

क्रमांक : व्हीपीएम २०२१/ प्र.क्र.१९/पंरा-४ दिनांक:- २४ फेब्रुवारी, २०२१.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व (रत्नागिरी वगळता)

विषय:- ग्रामीण क्षेत्रातील इमारत बांधकाम परवानगीबाबत.
संदर्भ:- नगरविकास विभाग शासन अधिसूचना दिनांक ०२ डिसेंबर, २०२०

महोदय,

नगरविकास विभागाची सोबत जोडलेली दिनांक ०२ डिसेंबर, २०२० रोजीची अधिसूचना व सोबतची परिशिष्ट कृपया अवलोकित करावी.

नगरविकास विभागाने उपरोक्त अधिसूचनेन्वये इमारत बांधकामाबाबत बांधकाम परवानगीचे निकष निश्चित केले आहेत. सदर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली(Unified Development Control And Promotion Regulations) मधील खंड क्र.२ मधील २.१.२(XV)येथील तरतुदीनुसार १५० चौरस मीटर क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडावरील (Low risk Category) आणि १५० चौरस मीटर ते ३०० चौरस मीटर क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडावरील (Moderate risk Category) इमारत बांधकामाकरिता परिशिष्ट (APPENDIX "K") मधील विहीत अटी व शर्तीच्या अधिन राहून परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. सदरील शासन अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर कायदे/नियम या शीर्षकाखाली नगरविकास विभागाच्या अधिनस्त उपलब्ध आहे.

सदरची अधिसूचना व त्यामधील तरतूदी ग्रामीण क्षेत्रातील घरबांधणी परवानगीच्या अनुषंगाने आपल्या अधिनस्त सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात, ही विनंती.

आपला,

(लहूराज माळी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत:- वरीलप्रमाणे.